औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण समाजाच्या विकासामध्ये महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाची भूमिका

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत आंतरविद्याशाखीय विद्याशाखे अंतर्गत

समाजकार्य विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावायाचा

शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक विद्यार्थी

विठ्ठल रामनाथ जाधव

मार्गदर्शक

प्रा.डॉ.नरहरी पाटील

(एम.एस.डब्ल्यू .नेट, सेट ,पीएच.डी.)

सहाय्यक प्राध्यापक

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र नवीन नांदेड

जुलै 2021

औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण समाजाच्या विकासामध्ये महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाची भूमिका

प्रस्तावना:

महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत राज्य आहे, कायमस्वरूपी देशाच्या अर्थव्यवस्थेस व लोककल्याणाच्या कामामध्ये अग्रणीस्थानावर असते. जागतिकदृष्ट्याही महाराष्ट्र राज्याकडे भरभराटीचे राज्य व विविध क्षेत्रात संधी उपलब्ध करून देणारे राज्य म्हणून पहिले जाते. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन हे कंपनी अधिनियमाच्या कलम - ८ नुसार स्थापन करण्यात आली आहे. राज्यातील एक हजार गावे आदर्श करण्यासाठी महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची सुरूवात केली आहे. अभियानांतर्गत शासनाच्या विविध विभागांच्या कृती संगमातून ग्रामपंचायतींमध्ये सामाजिक व मुलभुत सोई सुविधांना चालना देण्यासाठी कार्पोरेट कंपन्यांची मदत घेण्यात येत आहे. आदर्श ग्राम निर्माण करताना ग्रामपंचायती सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सरपंच व ग्रामसेवक यांना ग्रामविकासाचे दुत म्हणून कार्य करण्याचा विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान व यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील जिल्ह्यांमध्ये सरपंच व ग्रामसेवक यांची प्रशिक्षणाद्वारे क्षमता बांधणी करण्यात येते.

जलयुक्त अभियानाच्या यशातून महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन प्रतिष्ठानाचे बीजारोपण झाले. ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान हे एक सार्वजनिक, खाजगी, सेवाभावी संस्था व भारतातील अग्रणी खाजगी कंपनी यांच्या भागीदारीतून राष्ट्र बांधणीत विकासाचा मार्ग

सुकर करून ग्रामीण महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तन घडविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान अंतर्गत मानवी निर्देशांक कमी असलेल्या जिल्ह्यातील एकुण एक हजार गावांची निवड करण्यात आली आहे. ग्रामपंचायतींमध्ये तांत्रिक मार्गदर्शनासाठी व पायाभुत सुविधा निर्माण करण्याठी ग्राम परिवर्तकांची नेमणूक करण्यात आली आाहे. हे ग्राम परिवर्तक प्रशासन आणि ग्रामपंचायत यांचा दुवा म्हणून कार्यरत आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामपंचायतींला मिळवून देण्यासाठी ग्राम परिवर्तकांमार्फत गाव विकास आराखडा तयार करण्यात येतो. त्यामध्ये ग्रामपंचायतींच्या गरजा ओळखून ग्राम सभेच्या माध्यमातून कामे प्रस्तावित करण्यात येतात. यामध्ये सरपंच व ग्रामसेवक यांची महत्त्वाची भुमिका आहे. हे ओळखून शासनाने सरपंच व ग्रामसेवक यांना अधिक सक्षम करण्याचे धोरण आखले आहे.

महाराष्ट्रातील आदर्श ग्रामपंचायती म्हणून पोपटराव पवार यांच्या हिवरे बाजार जि. अहमदनगर, अण्णा हजारे यांच्या राळेगणसिध्दी, भास्करराव पेरे यांच्या पाटोदा जि. औरंगाबाद अशा ग्रामपंचायतींनी लोकसहभागातून उत्कृष्ट काम करून इतर ग्रामपंचायतीसाठी आदर्श निर्माण केला आहे. अशा आदर्श ग्रामपंचायतींची प्रेरणा घेऊन, महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तनात निवड गावांतील सरपंच व ग्राम सेवकांनी आपल्या ग्राम पंचायतीमध्ये कार्य करावे व आदर्श ग्राम निर्माण करावे, ही अपेक्षा आहे. प्रशिक्षणामध्ये ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, शासकीय योजनांमध्ये लोकसहभाग मिळविणे, ग्रामपंचायतीचा कारभार पारदर्शक करणे, ग्रामपंचायत हद्दीतील शासकीय इमारती, देखभाल व दुरूस्ती, गाव विकास आराखड्यातील प्रस्तावित कामांना गती देणे अशा काही महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश आहे.

<u>ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान लक्ष घटक:</u>

ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानांतर्गत महिला व बाल विकास, आरोग्य, शिक्षण, रोजगार, कौशल्य व उद्योजकता विकास, शाश्वत कृषी विकास, पशु संवर्धन, रस्ते व सार्वजनिक बांधकाम, पर्यावरण व जैवविविधता, स्वस्त व स्वच्छ ऊर्जा, समाज प्रबोधन, स्वच्छ पेयजल आणि स्वच्छता, नाविन्यपूर्ण उपक्रम, बाजार उपलब्धता इत्यादी लक्ष घटकांवर कार्य करण्यात आले आहे.

<u>ग्राम परीवर्तक:</u>

महाराष्ट्र राज्य शासनामार्फत ग्राम सामाजिक कार्याला गती प्राप्त करून देण्यासाठी ग्राम परिवर्तकाची नेमणूक करण्यात येते. गाव पातळीवर सुशिक्षित, प्रशिक्षित व समाजाचे ज्ञान असणारा संसाधन व्यक्ती म्हणून ग्राम परिवर्तकाची नेमणूक करण्यात येते. सरपंच, ग्रामसेवक व ग्राम प्रवर्तकाच्या साह्याने ग्रामीण भागाचे परिवर्तन घडून एक आदर्श गाव निर्माण करण्याचे ध्येय राज्यशासनाचे आहे. स्थानिक पातळीवर ग्राम परीवर्टकाच्या साहाय्याने ग्रामस्तरावरील सर्व विभाग व इतर सहाय्यक विभाग यांच्यामध्ये समन्वय घडवून ग्राम विकास साधने अपेक्षित आहे. भौतिक विकासाबरोबर सामाजिक विकासही घडवून यावा यासाठी ग्राम प्रवर्तकाची नेमणूक करण्यात आली. ग्राम परिवर्तन हा ग्रामपंचायतला निवासी असतो.

<u>संशोधन विषयाचे महत्त्व:</u>

भारतीय समाज हा मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात राहणारा आहे. आजच्या आधुनिक युगामध्ये शहरी भागांचा विकास जलद गतीने होताना आढळतो, परंतु ग्रामीण भागाचा विकास संथ गतीने होत आहे. आजही ग्रामीण भागात खूप मोठ्या समस्या भेडसावत आहेत, परंतु त्या समस्या दूर करण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम-योजना मात्र खूप त्रोटक आहेत. खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत, अस्तित्वात

असलेल्या समस्या दूर करण्यासाठी व राबविण्यात येणारे उपक्रम-योजना यांचा परिणाम अभ्यासण्यासाठी प्रस्तुत समाजकार्य संशोधन हे खूप महत्त्वपूर्ण ठरते.

<u>संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:</u>

प्रस्तुत समाजकार्य संशोधन हे औरंगाबाद जिल्हा या पुरते मर्यादित असुन अभ्यास विषयासाठी अनुसूची भरतांना महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानात निवडण्यात आलेल्या ग्रामपंचायती मधील व्यक्ती ची उत्तरदाता म्हणून निवड करण्यात येईल, त्याचप्रमाणे प्रत्यक्ष निरीक्षण व मुलाखतीद्वारे माहिती संकलन करण्यात येईल.

<u>संशोधनाची उद्दिष्टे:</u>

1. ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानामार्फत झालेल्या समाजप्रबोधनाचे अध्ययन करणे
2. ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानामुळे महिला व बालविकासात झालेल्या बदलांचे अध्ययन करणे
3. ग्राम सामाजिक परिवर्तनामुळे शिक्षणात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे
4. ग्राम सामाजिक परिवर्तनामार्फत झालेल्या स्वच्छताविषयक बदलांचा अभ्यास करणे.

<u>संशोधनाची गृहितके:</u>

1. शिक्षण व राजकीय सक्रीय सहभागातून समाज प्रबोधन घडले.
2. शासकीय सहभाग व स्वयं सहायता समूह यांच्यामुळे महिला बालविकास योजनांची अंमलबजावणी झाली.
3. पालक व शिक्षकांच्या सक्रीय सहभागाने शिक्षणात आमूलाग्र बदल झाले.
4. ग्रामपंचायत, तरुण मंडळ व महिला यांच्यामुळे ग्रामस्वच्छतेस मदत झाली.

<u>समाजकार्य संशोधन पद्धती:</u>

समाजकार्य संशोधन ही समाजकार्याच्या सहा पध्दतीपैकी एक पध्दती आहे. समाजकार्याच्या व्यक्ती सहयोग कार्य, गटकार्य, समुदाय संघटन, सामाजिक कृती, समाज कल्याण प्रशासन या पध्दती वापरुन कार्य करत असतांना समाजकार्य कर्त्याला सामाजिक संशोधन पध्दती वापरणे क्रमप्राप्त ठरते. समाजकार्याच्या इतर पध्दतीचा वापर करुन समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. समाजकार्य संशोधनातून समाजकार्याच्या पध्दतीची कार्यपध्दती, कौशल्य साधने, हस्तक्षेपाच्या व्हयूरचना, कार्याचे मुल्यांकन, समाजकार्य कर्त्यांच्या कामाचे व अशिलाच्या प्रगतीचे मुल्यांकन इत्यादीवर लक्ष केंद्रित केले जाते. समाजकार्य संशोधन ही पध्दती सामाजिक संशोधन पध्दतीपेक्षा थोडयाफार प्रमाणात निराळी आहे. सदयस्थितीत समाजकार्याच्या ज्ञानाची उपयोगिता, त्याची आवश्यकता, तसेच क्षेत्र कार्य करतांना वापरण्यात येणारी तंत्रे, कौशल्य यांची प्रमाणता समाजकार्य संशोधनाव्दारे तपासली जाते. समाजकार्याच्या ज्ञानाची परिणामकारकता वाढविण्यासाठी सुध्दा समाजकार्य संशोधनाचा उपयोग केला जातो. समाजकार्य संशोधन पध्दतीव्दारा समाजकार्याच्या नविन ज्ञानाची निर्मिती, सिध्दांताची निर्मिती तसेच सदयस्थितीत असणा-या सिध्दांताची उपयोगीता याचे परिक्षण केले जाते. काळानरुप बदललेल्या परिस्थितीत समाजकार्याच्या पध्दती अधिक प्रभावीपध्दतीने कशा वापरता येतील याचा विचार सुध्दा समाजकार्य संशोधनामध्ये केला जातो. समाजकार्य संशोधन हे समाजकार्य क्षेत्रातील प्रश्नांची उत्तरे शोधणे आणि सामाजिक कार्याचे ज्ञान आणि संकल्पना यांचा विस्तार करणे आणि सामान्यीकरण करण्याच्या उद्देशाने समाज कल्याण क्षेत्रातील प्रश्नांची पध्दतशिर आणि गंभीर चौकशी होय.

प्रस्तुत समाजकार्य संशोधनात संमिश्र पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. या संशोधनामध्ये महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाने केलेल्या विकासात्मक कार्याचा अभ्यास वर्णनात्मक पद्धतीने तर त्या कार्यामुळे झालेल्या सामाजिक परिणामाचा अभ्यास विश्लेषणात्मक पद्धतीने करण्यात येईल.

1. संकलन पद्धत: प्रस्तुत विषयाच्या समाजकार्य संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

अ) प्राथमिक माहिती स्त्रोत:

विषयाच्या समाजकार्य संशोधनासाठी प्राथमिक साधन सामग्री वापरण्यात येणार आहे त्यामध्ये मुलाखत, मुलाखत अनुसूची व निरीक्षण पद्धती इत्यादी साधनांचा उपयोग करण्यात येईल.

ब) द्वितीय माहिती स्त्रोत:

दुय्यम साधनसामग्री मध्ये पूर्वी संशोधन केलेल्या समाजकार्य संशोधन उदा. पीएच. डी. चे प्रबंध, एम. फील. चे प्रबंध, शासनाने प्रकाशित केलेल्या अहवाल, शासनाचे जीआर, मासिके, दैनिक वर्तमानपत्रे मंत्रालयाने प्रकाशित केलेली प्रकाशने, तसेच जिल्हा परिषदेने प्रकाशित केलेली प्रकाशने, महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाची प्रकाशने इत्यादी साधनांचा उपयोग संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

2. माहिती विश्लेषण: संशोधनासाठी संकलित केलेल्या माहितीचे सारणीयन करून विश्लेषण करण्यात येईल. माहितीच्या स्पष्टीकरणासाठी आलेख, नकाशा इत्यादी साधनांचा उपयोग करण्यात येईल. संकलित केलेल्या माहितीचे संख्याकिय विश्लेषण करण्यात येईल.

3.नमुना निवड पद्धती: प्रस्तुत समाजकार्य संशोधनासाठी गैर संभाव्यता नमुना निवड प्रकारांमधील सोयीस्कर नमुना निवड पद्धतीने 300 उत्तरदात्यांची निवड करण्यात येईल व चार गावचा अभ्यास यस्टी (case studies) अध्ययन पद्धतीने करण्यात येईल.

4.संशोधन अभ्यास क्षेत्र: प्रस्तुत समाजकार्य संशोधनाचे क्षेत्र हे औरंगाबाद जिल्हा आहे. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना-उपक्रमाचा

अभ्यास करण्यासाठी व यामुळे गाव पातळीवर झालेल्या सामाजिक बदलांचा अभ्यास करण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायतीमध्ये ग्रामस्थ हा एकक आहे.

5. प्रकरण नियोजन: प्रस्तुत समाजकार्य संशोधनाची मांडणी करण्यासाठी संशोधनाचे पाच प्रकरणांमध्ये विभागणी करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले: प्रस्तावना, विषयाची सविस्तर माहिती, साहित्याचे परीक्षण.

प्रकरण दुसरे: संशोधन आराखडा.

प्रकरण तिसरे: सारणीयन व विश्लेषण.

प्रकरण चौथे: गृहीतकृत्याची पडताळणी व सामान्य निष्कर्ष.

प्रकरण पाचवे: निष्कर्ष, सारांश, गृहितकृत्याची सिद्धता, समाजकार्य प्रारूप व सूचना.

संदर्भ सूची: मुलाखत अनुसूची, संदर्भसूची.

6. संदर्भ ग्रंथ सूची

- आगलावे प्रदीप, 1999, समाजशास्त्रीय संकल्पना आणि सिद्धांत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- प्रा. घाटोळे रा. ना., समाजशास्त्र संशोधन तत्त्वे व पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
- www.shodhganga.com
- www.maharashtra.gov.in
- www.wikipedia.com

याचप्रमाणे शासकीय योजना-पुस्तके, लोकराज्य मासिक, महाराष्ट्र शासनाचे अहवाल, ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाचे अहवाल, इत्यादी साहित्याचा उपयोग करण्यात आलेला आहे.

संशोधक विद्यार्थी	मार्गदर्शक
विठ्ठल रामनाथ जाधव	प्रा.डॉ.नरहरी पाटील (एम.एस.डब्ल्यू .नेट, सेट ,पीएच.डी.) सहाय्यक प्राध्यापक जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र नवीन नांदेड